सकाळ



कोल्हापूर : आद्यक्रांतिवीर उमाजीराजे नाईक यांना आदरांजली वाहताना शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी उपस्थित होते.

# उमाजीराजे नाईक यांना अभिवादन

कोल्हापूर : आद्यक्रांतिवीर उमाजीराजे नाईक यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आदरांजली वाहण्यात आली. मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते उमाजीराजे नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या प्रमुख डॉ. ज्योती जाधव, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. शिवलिंगप्पा सपली, जैवतंत्रज्ञान विभागाचे 'इन्सा' फेलो डॉ. व्ही. ए. बापट, दीप्ती खुर्दे, ओंकार अपिने, नीलेश तरवाळ, नितीन नाईक, गजानन नाईक, विक्रम कानुगडे आदी उपस्थित होते.

10 SEP 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारत-जपानमधील सहसंबंध ज्ञानाधारित आवश्यक : डॉ. सहस्त्रबुद्धे

## शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारत आणि जपान देशांमधील सहसंबंध हे ज्ञानाधारित असावेत. त्याद्वारे दोन्ही देशांमध्ये प्रगतीच्या अनेकविध संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्ह अंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान, तंत्रज्ञान परिषदेचे डॉ. सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. डी.टी. शिर्के होते. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे म्हणाले, भारत आणि जपान यांच्यामध्ये भगवान बुद्धाच्या काळापासून आध्यात्मिक संबंध प्रस्थापित झाले आहेत. जपानच्या 'ल्युपेक्स' चांद्रयान मोहिमेसाठी जपानी अवकाश संस्थेशी 'इस्त्रो'ने सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. दोन्ही देशांतील संबंध पुढील काळात अधिक दृढ होण्याच्या दृष्टीने परिषद महत्त्वाची भूमिका बजावेल.

जपानचे मुंबईतील कॉन्सूल जनरल डॉ. फुकाहारी यासुकाता म्हणाले, भारत हा आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या जपानचा महत्त्वाचा भागीदार आहे. उद्योग-व्यवसायाच्या दृष्टीने जपानी कंपन्यांना भारतात मोठा रस असून नजीकच्या कालखंडात भारतात जपानी गुंतवणुकीचा ओघ मोठ्या प्रमाणात येऊ लागेल. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या परिषदेमुळे शिवाजी विद्यापीठ व जपान यांच्यात ज्ञानसंवर्धनाबरोबरच आता आध्यात्मिक व सांस्कृतिक संबंधही अधिक दृढ होण्यास बळ मिळेल.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्ह अंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान, तंत्रज्ञान परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलताना डॉ. विनय सहस्त्रबुद्धे. सोबत डॉ. सरिता ठकार, प्रा. डी. शक्तीकुमार, डॉ. जी.डी. यादव, कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. फुकाहारी यासुकाता, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, डॉ. शिवाजी सादळे.




ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. जी.डी. यादव यांचे 'दि नेट झीरो गोल अँड सस्टेनॅबिलिटी' या विषयावर बीजभाषण झाले. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी सादळे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डी. शक्ती कुमार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार उपस्थित होते.

10 SEP 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतातून शिकून परतताना 'भारतीयत्व' सोबत न्या

## आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांचे आवाहन



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतातून शिकून परतताना थोडासा भारत आणि भारतीयत्व आपल्यासोबत मायदेशी घेऊन जा, असे आवाहन भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी शिवाजी विद्यापीठात शिकणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना केले.

शिवाजी विद्यापीठात १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्ह अंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेचे उद्‌घाटक म्हणून डॉ. सहस्त्रबुद्धे शिवाजी विद्यापीठात आले होते. या सत्रानंतर त्यांनी भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठात विविध अभ्यासक्रमांना प्रविष्ट झालेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी-विद्यार्थिनींशी आवर्जून संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाले, भारत हा अत्यंत सहिष्णू वृत्तीचा देश असून, प्रेमळ व शांतिप्रिय आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांनी येथून परतताना हा भारत कायमस्वरूपी आपल्या हृदयात जपून ठेवावा, असेही सांगितले.

10 SEP 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय परिषदेत शालेय विद्यार्थ्यांची मने झाली 'ईग्नाईट'

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बेरोजगारीचे संकट गहिरे होणार नाही का?, मानवी मेंदूला मागे टाकून हे तंत्रज्ञान पुढे जाईल का?, विज्ञान-तंत्रज्ञानात्मक प्रगती मानवतेला धोकादायक ठरेल का?, जैवतंत्रज्ञानाच्या बाबतीत सरकारने कोणती धोरणे स्वीकारणे अभिप्रेत आहेत?, चंद्रावर पूर्णपणे मानवरहित रोबोटिक प्रयोगशाळा उभारणे शक्य आहे का?, अशा अनेक प्रश्नांना शालेय विद्यार्थ्यांनी वाट मोकळी करून दिली. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे उपस्थित संशोधकांनी दिली.

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या १३ व्या भारत-जपान विज्ञान आणि तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेमध्ये आयोजित 'ईग्नाइटिंग माईंड्स ऑफ स्कूल चिल्ड्रेन' विशेष उपक्रम घेतला. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात शालेय विद्यार्थ्यांसमवेत संशोधकांच्या संवादाचे आयोजन केले.

संशोधकांनी विद्यार्थ्यांना विज्ञान तंत्रज्ञानाचे त्यांच्या आयुष्यातील महत्त्व सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेकडे प्रचंड विश्लेषण क्षमता आहे. मानवतेच्या हितासाठी त्याचा वापर केला पाहिजे. विज्ञानातून निर्माण होणारी प्रत्येक बाब दुधारी आहे. तिचा वापर मानवजातीच्या कल्याणासाठी करावयाचा की विध्वसांसाठी, हे ती वापरणाऱ्या हातांवर अवलंबून राहील. दर्जेदार पुस्तके वाचण्याची सवय अंगी बाणवा, असे आवाहन संशोधकांनी केले.



**कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय परिषदेअंतर्गत ईग्नाइटिंग माईंड्स ऑफ स्कूल चिल्ड्रेन उपक्रमात सहभागी विद्यार्थी, संशोधक.**

डॉ. इरी इकेदा यांनी विज्ञानाच्या साथीने मानव्यशास्त्रांचा अभ्यासही समृद्ध करणारा ठरतो. त्यामुळे त्यांना कमी लेखू नये, असे सांगितले. डॉ. श्याम नंदी, डॉ. स्मिता पवार, डॉ. जयकुमार सीलम, डॉ. शक्ती शहा, प्रा. डी. शक्ती कुमार यांनी संवाद साधला. उपक्रमात वसंतराव चौगुले इंग्लिश मीडियम स्कूल, कोरगावकर हायस्कूल, विद्यापीठ हायस्कूल, वि.स. खांडेकर प्रशाला, छत्रपती शाहू विद्यालय, सेव्हन्थ डे एडव्हांटिस्ट हायर सेकंडरी स्कूल शाळांमधील शंभर विद्यार्थी तसेच अरुंधती शुक्ला, मालती हरळीकर, सतीश नंदनवार, शिवप्रसाद चौगुले, प्रमोद कुलकर्णी, क्षितिजा लांबोरे, पद्मा कोरवी, शिवाजी तिवडे आदी शिक्षकांसह उपस्थित होते.

वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजाराम गुरव यांनी स्वागत केले. डॉ. मनोज लेखक यांनी सूत्रसंचालन केले.डॉ. स्वरुपा पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख, डॉ. वर्षा जाधव, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.

10 SEP 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कृत्रिम बुद्धिमत्तेचा मानवी हितासाठी वापर व्हावा

## शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विज्ञान-तंत्रज्ञान परिषदेतील सूर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर हा मानवी हितासाठी करावा, असा सूर शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या १३ व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेत उमटला. निमित्त होते आयोजित 'इग्नाइटिंग माईंडस् ऑफ स्कूल चिल्ड्रेन' या विशेष उपक्रमाचे!

कृत्रिम बुद्धिमत्तेकडे प्रचंड विश्लेषण क्षमता आहे. मानवतेच्या हितासाठी त्याचा वापर केला पाहिजे. मानवी गरजा भागविण्यासाठी जैवतंत्रज्ञानाची आधुनिक विज्ञानाचा अवलंब करण्याखेरीज पर्याय नाही. प्रत्येक पिढीने काम करायला हवे. ऐकण्यात, पाहण्यात येणारी प्रत्येक बाब ही विज्ञानाच्या कसोटीवर पारखून पाहण्याची सवय विद्यार्थ्यांनी लावून घ्यावी. मोबाईल, टीव्ही आदींवर जाणारा आपला स्क्रीन टाईम कमी करून मैदानी खेळांवर जाणीवपूर्वक भर द्यावा, व्हिडीओंमध्ये सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याऐवजी दर्जेदार पुस्तके मुळापासून वाचण्याची सवय अंगी बाणवा, असे आवाहनही या संशोधकांनी विद्यार्थ्यांना केले. जपानी संशोधक डॉ. इरी इकेदा, ज्येष्ठ संशोधक डॉ. श्याम नंदी, जैवतंत्रशास्त्रज्ञ डॉ. स्मिता पवार, गोव्याचे डॉ. जयकुमार सीलम, बनारस हिंदू विश्वविद्यालयाचे रसायनशास्त्रज्ञ डॉ. शक्ती शहा आणि इंडियन जेएसपीएस अल्युम्नाय असोसिएशनचे (आयजेएए) अध्यक्ष प्रा. डी. शक्ती कुमार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजाराम गुरव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मनोज लेखक यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. स्वरुपा पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख, डॉ. वर्षा जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे उपस्थित होते.

पुढारी

# ‘भारत - जपान यांच्यात विविध क्षेत्रांत सहकार्यवृद्धी आवश्यक’

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बदलत्या जागतिक परिस्थितीमध्ये भारत व जपान यांनी शिक्षण, संशोधनासह विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहकार्यवृद्धी करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन जपानच्या टोकियो येथील सोफिया विद्यापीठाचे वरिष्ठ संशोधक प्रा. योशिरो अझुमा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आयोजित १३व्या भारत-जपान विज्ञान व तंत्रज्ञान कॉन्क्लेव्हअंतर्गत आंतरराष्ट्रीय विज्ञान तंत्रज्ञान परिषदेच्या पूर्वसंध्येला प्रा. अझुमा यांचे मजपान आणि भारतामधील वैज्ञानिक संशोधनाची संस्कृती व शिक्षण : आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन व समकालीन संधी या विषयावर खुले व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

प्रा. अझुमा म्हणाले, जपान व भारत यांची सद्यस्थिती बरीचशी परस्परपूरक आहे. दोन्ही देशांमध्ये संधींचे अवकाश अत्यंत व्यापक आहे. मनुष्यबळाच्या बाबतीत जपान तोकडा पडतो. भारत मात्र मनुष्यबळाच्या बाबतीत समृद्ध आहे. येथील शिक्षण, संशोधनाचा त्याचप्रमाणे सोयीसुविधांचा दर्जाही वाढतो आहे. या पार्श्वभूमीवर या दोन्ही देशांमध्ये शिक्षक, संशोधक, विद्यार्थी यांनी परस्परांच्या देशांमधील उपलब्ध सुविधांचा लाभ घेण्यासाठी सुसज्ज व्हावे. खरे तर, भारताला जपानची जितकी गरज आहे, त्याहूनही अधिक जपानला भारताची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. परिषदेचे समन्वयक डॉ. एस. बी. सादळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कविता ओझा यांनी आभार मानले.

पुढारी

# 'इस्त्रो'चे उपसंचालक डॉ. शर्मा यांचे 'चांद्रयान-३'वर उद्या विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : भारतीय अवकाश संशोधन संस्थेचे (इस्त्रो) उपसंचालक डॉ. एस.व्ही. शर्मा वशास्त्रज्ञ डॉ. आर. श्रीविध्या या दोन वरिष्ठ शास्त्रज्ञांची सोमवारी (दि. ११) शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान अधिविभागांतर्गत 'मीट दि सायंटिस्ट' हा उपक्रमांतर्गत सोमवारी सकाळी ११.३० वाजता इस्त्रोचे उपसंचालक डॉ. एस. व्ही. शर्मा यांचे 'चांद्रयान-३' व दुपारी १२.३० वाजता इस्त्रोच्या शास्त्रज्ञ डॉ. आर. श्रीविध्या यांचे 'आदित्य एल-१' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. केशव राजपुरे यांनी केले आहे.